# आदर्श महाविद्यालय येथे विश्व संस्कृत दिन संपन्न

**धामणगांव रेल्वे दि ६:** आदर्श विज्ञान जे.बी. कला व बिरला वाणिज्य महाविद्यालय

## गवई यांचे प्रतिपादन

श्रीरामे यांनी केले. या बैठकीचे सुत्रसंचालन सुरेशजी वानखडे यांनी केले.

या कार्यक्रमास वरिल मान्यवर व आयोजकासमवेत अशोक वाघमारे, गिरिधर सवाई रूपचंद्रजी गुजर, रामदासजी हांडे, नरेंद्रभाऊ ढाणके, योगेशजी गुजर, राजकुमारजी धाकडे, आनंदराव रामटेके, हरिदासजी डवले, विजय लोखंडे सह उपासकासोबत अनेक उपासिका सुध्दा उपस्थित होत्या.

## राख्या

### उपक्रम......

सेवेने या राख्या पाठवल्या आहे.

अशा प्रकारचे अनेक उपक्रम दरवर्षी भारतीय जवानांसाठी डॉक्टर एम के पवार शैक्षणिक संकुल राबवीत आहे. अशा या सुप्त उपक्रमातून कला शिक्षण व विद्यार्थ्यांच्या कलेला वाव मिळवून या भारत भूमीच्या रक्षणासाठी जवानांना आहे त्यांना मंगलमय शुभेच्छा सुद्धा शाळेने पाठवल्या आहेत



धामणगाव रेल्वे येथील संस्कृत विभागाच्या वतीने विश्व संस्कृत दिन मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य वाय. बी. गांडोळे सर यांनी भूषविले. कार्यक्रमाचे मुख्य अतिथी म्हणून इंग्रजी विभाग प्रमुख प्रा. डॉ. संजय पाटील उपस्थित होते. दीप प्रज्वलन व स्वागत गीताने अतिथींचे स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. पूनम गहुकर संस्कृत विभाग प्रमुख यांनी केले. नाविन्यपूर्ण संस्कृत दिनाचे आयोजन विद्यार्थ्यांच्या कलेचं प्रदर्शन यामागचा मुख्य उद्देश असून भारतीय संस्कृती दर्शन या संकल्पनेवर महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी भव्य रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी भारतातील विविध प्रादेशिक वेशभूषा परिधान करून विद्यार्थ्यांनी सर्वांचे लक्ष वेधले. महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करीत महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, गुजरात प्रांत, राजस्थान प्रांत, पंजाब प्रांत, बंगाल प्रांत, दक्षिण प्रांत या वेशभूषेत विद्यार्थ्यांनी आपली प्रस्तुती दिली. विद्यार्थ्यांचा आगळा वेगळा उपक्रम संस्कृत लघुनाटिका 'कन्या शिक्षते राष्ट्र शिक्षते' प्रस्तुत केले. विशेष कौतुक म्हणजे या विद्यार्थ्यांनी संस्कृत वाक्य स्वतः तयार करून ती सर्वांसमोर प्रस्तुत केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैष्णवी कोहरे व वैभव जाधव यांनी केले. आभार प्रदर्शन सोनम विरुळकर हिने केले. कार्यक्रमाला प्रमुख वक्ता म्हणून लाभलेले प्राचार्य गांडोळे सरांनी सर्वांना संस्कृत भाषेचे महत्व पटवून सांगितले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील कला विभागाचे प्रा.डॉ. बारापात्रे, प्रा. बंड, प्रा.डॉ. पठाण, क्रीडा विभागाचे प्रा डॉ. चिंचमलातपुरे, गणित विभाग प्रमुख प्रा. डॉ. बादस्कर प्रा.डॉ. अश्विना रंगारी, भौतिकशास्त्र विभागाच्या प्रा डॉ. शिल्पा विघळे, संगणक विभागाच्या प्रा. डॉ. मावळे मॅडम व इतर शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व महाविद्यालयीन विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्विते करिता संस्कृत विभागाचे विद्यार्थी अक्षय मुरके, राधिका गुप्ता, पल्लवी काळे, अदिती भोगे, आकांक्षा गवाले, स्नेहल इंगळे, दर्शना अर्मळ, वैष्णवी चांदुरे, धर्मेंद्र ठोसर, संदेश वैद्य, सोनम विरुळकर, पूर्वा रायते, साक्षी भगत, निशा चिडाम, आंचल राऊत, वैष्णवी ... दाभाडे, रिद्धी ... व इतर सर्व ... मेहनत घेतली.

**Celebration of World Sanskrit Day**

# आदर्श महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनादिन



**नमस्कार अमरावती**

**धामणगाव रेल्वे (ता.प्र.)** **दि.२६:** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अमरावती संलग्नित, धामणगाव एज्युकेशन सोसायटी द्वारा संचालित (हिंदी भाषिक अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था) आदर्श विज्ञान ज. भा. कला व बिरला वाणिज्य महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेचा उद्घाटन सोहळा राष्ट्रीय सेवा योजनेचा स्थापना दिवसाचे औचित्य साधून थाटात पार पडला.

या कार्यक्रमाला जागतिक संस्थेचे स्वयंसेवक राधा गिरी (उत्तर प्रदेश), हिमांशु भारत (उत्तर प्रदेश), एम.टोंगपैंग (नागालँड), प्रिया जाटव (मध्य प्रदेश) व रोहित जगताप (महाराष्ट्र) प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. अध्यक्षस्थानी कला शाखेचे प्रमुख डॉ. दीपक शृंगारे होते. प्रास्ताविक रा. से. यो. कार्यक्रम अधिकारी डॉ. श्रीकांत पाटील यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रा.जितेंद्रसिंग बारुळकर यांनी करून दिला. अध्यक्षीय भाषणात डॉ. शृंगारे यांनी राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये स्वयंसेवकांची मोलाची भूमिका यावर प्रकाश टाकला. सकाळी डॉ. प्रवीण केचे यांच्या नेतृत्वात महाविद्यालयाच्या स्वयंसेवकांची स्वच्छता रॅली काढण्यात आली. स्वयंसेवकांनी ग्रामीण रुग्णालय धामणगाव रेल्वे येथे भेट देऊन सफाई अभियान राबवविले सोबतच परिसर स्वच्छता व रंग रंगोटी, गाजर गवत निर्मूलन असे विविध कार्यक्रम राबवण्यात आले. कार्यक्रमाकरिता समन्वयक डॉ. आनंद नरांजे, सल्लागार मंडळाचे सदस्य डॉ. नरेंद्र नागपुरे, डॉ. रुपेश डहाके यांनी मोलाचे सहकार्य केले. कार्यक्रमाला प्राध्यापक वृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी स्वयंसेवक उपस्थित होते. रा.से.यो महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. पूनम गहुकर यांच्या मार्गदर्शनामध्ये संचालन नंदिनी चिखले हिने केले व आभार प्रदर्शन सोनम विरुळकर हिने केले. प्रा. विशाल मोकाशे यांच्या नेतृत्वामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या वरिष्ठ, कनिष्ठ स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.

**Celebration of National NSS Day**

# आदर्श विज्ञान महाविद्यालयामध्ये वन्यजीव सप्ताह-2023 उत्साहात



**ता.प्रतिनिधी/२६ ऑक्टोबर**

**धामणगाव रेल्वे** -वन्यजीव संवर्धनासाठी व शालेय विद्यार्थ्यांमध्ये वन्यजीवांच्या संवर्धनाबद्दल जागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने स्थानिक आदर्शविज्ञान, ज.भा. कला व बिर्ला वाणिज्य महाविद्यालय, धामणगाव रेल्वे येथे प्राणिशास्त्र विभाग आणि सायन्स असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक 03.10.2023 ते 07.10.2023 दरम्यान वन्यजीव सप्ताह साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे उद्घाटन दिनांक 04.10.2022 रोजी महाविद्यालयाचे मा. प्राचार्य डॉ. योगेंद्र गांडोळे यांच्या हस्ते आणि प्रमुख अतिथि डॉ. जयंत वडतकर, मानद वन्यजीव संरक्षक, अमरावती तथा प्रा. डॉ. एस. ओ. कुरैशी, विभाग प्रमुख, प्राणिशास्त्र विभाग, आदर्श महाविद्यालय, धामणगाव रेल्वे, डॉ. सचिन मनोहरे, समन्वयक, सायन्स असोसिएशन, डॉ. आनंद नरांजे, आय. क्यू. ए. सी. समन्वयक आणि श्री. जितेंद्र सूर्यवंशी, सहाय्यक प्राध्यापक, प्राणिशास्त्र विभाग यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. प्रसंगी प्राणिशास्त्र मंडळाचे उद्घाटन करण्यात आले. प्राणिशास्त्र मंडळाच्या कार्यकारिणीत अध्यक्ष उमेर खान, उपाध्यक्ष कु. निकिता वानखडे, सचिव पवन नागपुरे, कोषाध्यक्ष कु. रुचिता दुबे, सहसचिव प्रज्वल सोनोणे, यांची निवड करण्यात आली. या सप्ताहामध्ये वन्यजीव विषयक व्याख्यान, रांगोळी स्पर्धा, पोस्टर स्पर्धा, प्रश्नमंजूषा, वन्यजीव प्रदर्शनी, छत्रपती शिवाजी महाराज विद्यालय, धामनगाँव रेल्वे भेट तथा तेथील विद्यार्थ्यांसाठी पोस्टर आणि निबंध स्पर्धा असे कार्यक्रम घेण्यात आले.

या सप्ताहाचा समारोपिय कार्यक्रम दिनांक 07.10.2023 रोजी महाविद्यालयाचे मा. प्राचार्य डॉ. योगेंद्र गांडोळे, प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. जयश्री थोटे, प्राणिशास्त्र विभाग प्रमुख, श्री. शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती तथा अभ्यास मंडल प्रमुख, प्राणिशास्त्र, सं.गा.बा. अमरावती विद्यापीठ, अमरावती, प्रा. डॉ. एस. ओ. कुरैशी, विभाग प्रमुख, प्राणिशास्त्र विभाग, डॉ. आनंद नरांजे, आय. क्यू. ए. सी. समन्वयक, श्री. जितेंद्र सूर्यवंशी, सहाय्यक प्राध्यापक, प्राणिशास्त्र विभाग आणि डॉ. सचिन मनोहरे, समन्वयक, सायन्स असोसिएशन आदर्श महाविद्यालय, धामणगाव रेल्वे यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. या प्रसंगी स्पर्धेच्या सर्व विजेत्यांना प्रमाणपत्र व पदक देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. एस. ओ. कुरैशी यांनी केले. प्रसंगी प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. जयश्री थोटे तथा मा. प्राचार्य डॉ. योगेंद्र गांडोळे यांनी उपस्थितांना मोलाचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचालन कु. प्राची बोरघाटे, अर्पण अजमिरे तर आभार प्रदर्शन कु. संस्कृती देशमुख यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्राणिशास्त्र विभागातील सर्व विद्यार्थी, विद्यार्थिनी आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले. त्यानंतर दिनांक 20.10.2023 रोजी शाळेतील स्पर्धेमधील विजेत्यांना व सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व पदक देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. यासाठी मुख्याध्यापक श्री. रोंघे, श्री. जगताप आणि इतर शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा मोलाचा सहभाग लाभला.

**Celebration of National Wild Life Week**

आदर्श महाविद्यालय येथे रसायनशास्त्र अभ्यास मंडळ ची स्थापना

# राष्ट्रीय रसायनशास्त्र सप्ताह 2023-24 निमित्ताने पोस्टर स्पर्धेचे यशस्वी



**ता.प्रतिनिधी/३ नोव्हेंबर**

**धामणगाव रेल्वे**-धामणगाव -एज्युकेशन सोसायटी द्वारा संचालित (हिंदी भाषिक अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्था) आदर्श महाविद्यालय, धामणगाव रेल्वे येथे दिनांक 21 ऑक्टोबर 2023 रोजी राष्ट्रीय रसायनशास्त्र सप्ताह 2023-24 चे आयोजन करण्यात आले सोबतच रसायनशास्त्र अभ्यास मंडळ - 2023 (विद्यार्थी युनिट) ची स्थापना करण्यात आली. या उद्घाटन सोहळ्याचे अध्यक्ष स्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाय. बी. गांडोळे यांनी भूषविले व प्रमुख अतिथी व उद्घाटक म्हणून बजाज कॉलेज, वर्धा येथील रसायन शास्त्र विभागाचे सहाय्यक प्राध्यापक, डॉ. प्रशांत बोरकर उपस्थित होते.

महाविद्यालयाचे IQAC समन्वयक व वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. आनंद नरांजे, प्राणिशास्त्र विभाग प्रमुख डॉ. एस ओ. कुरेशी, रसायनशास्त्र विभागाचे प्राध्यापक, डॉ. विष्णू सदाफळे, डॉ. पी. एम कंचे यांची मंचावर विशेष उपस्थिति लाभली.

कार्यक्रमाची रीतसर सुरुवात महा मानवांचे प्रतिमा पूजन व दीप प्रज्वलन करून झाली. उपस्थित मान्यवरांचे स्वागत आटोपल्यावर उद्घाटन सोहळ्याचे प्रास्ताविक रसायन शास्त्र विभागाचे विभाग प्रमुख डॉ. एस व्ही मनोहरे यांनी केले. आपल्या प्रस्तावाने मध्ये त्यांनी रसायनशास्त्र विभाग हा टीचिंग अँड लर्निंग सोबतच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकरिता खूप मेहनत घेतली जाते या वर प्रकाश टाकला व या वर्षी रसायनशास्त्र विभागाद्वारा राबवल्या जाणाऱ्या प्रस्तावित उपक्रमाची माहिती त्यांनी उपस्थितांना दिली. अतिथींचा परिचय डॉ. एच पी. मुंगसे यांनी दिला. प्राचार्य डॉ. वाय. बी. गांडोळे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणामध्ये उपस्थितांचे मार्गदर्शन केले व वैज्ञानिक संशोधनामध्ये रसायनशास्त्र विषयाचे अनन्यसाधारण महत्व त्यांनी उपस्थितांना पटवून दिले. डॉ. प्रशांत बोरकर यांनी आपल्या भाषणामधून अभ्यास मंडळाचे औपचारिक उद्घाटन केले व उपस्थितांना विशेष करून विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक धोरण, रसायनशास्त्र विषया वर आधारित नोकरीच्या वेगवेगळ्या संधी व त्यासाठी करावयाची मानसिक व अभ्यास विषयक तयारी यावर प्रकाश टाकला. स्वतः भारत सरकार पुरस्कृत शामा प्रसाद मुखर्जी ही सन्मानाची शिष्यवृत्ती प्राप्त असलेले डॉ. प्रशांत बोरकर यांचे मार्गदर्शन हे विद्यार्थ्यांसाठी खूप मोलाचे ठरले. आपल्या मार्गदर्शनाचे शेवट त्यांनी रसायनशास्त्र अभ्यास मंडळ- 2023 च्या संपूर्ण कार्यकारिणी च्या सदस्यांना आपल्या पुढील वाटचाली साठी शुभेच्छा देऊन केला. रसायनशास्त्र अभ्यास मंडळाचे नवीन कार्यकारिणीचे विद्यार्थी अर्पण अजमिरे (अध्यक्ष), प्रज्वल भोंगाडे (उपाध्यक्ष), प्राची बोरघाटे (सचिव), अथर्व गावंडे (कोशाध्यक्ष), वृषाली भुजाडे, वृषाली कडू, प्रज्वल सोनवणे, सेजल दीक्षित, धनश्री वाफले व रसायनशास्त्र विषयाच्या संपूर्ण विद्यार्थ्यांनी या उद्घाटन सोहळ्यात उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला. या कार्यक्रमाला गणित विभाग प्रमुख डॉ. एस. एन. बायस्कर, वनस्पती शास्त्र विभाचे सहा. प्रा. डॉ. एस. पी. पाटील यांच्या सोबत महाविद्यालयाचे इतर शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी हे आवर्जून उपस्थित होते. या निमित्ताने विद्यार्थ्यांच्या उर्वरित पेज २ वर

**Celebration of National Chemistry Week**

# आदर्श महाविद्यालय येथे जागतिक एड्स दिवस साजरा

## एड्स आजाराचा संपूर्ण नायनाट व जन जागृती तरुणांच्या हाती – प्राचार्य, डॉ. वाय. बी. गांडोळे

धामणगाव रेल्वे -संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती संलग्नित, धामणगाव एज्युकेशन सोसायटी द्वारा संचालित, आदर्श विज्ञान महाविद्यालय, धामणगाव रेल्वे येथे जागतिक एड्स दिवस साजरा करण्यात आला. हा कार्यक्रम राष्ट्रीय सेवा योजना आदर्श महाविद्यालय, सूक्ष्मजीवशास्त्र विभाग, रेड रिबीन क्लब ग्रामीणरुग्णालय, धामणगाव रेल्वे व कामगार कल्याण केंद्र महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलनाने झाली. प्रमुख अतिथी म्हणून रेड रिबीन क्लब धामणगाव रेल्वे चे समुपदेशक श्री निलेश वानखडे व श्री विनोद इंगळे, केंद्र संचालक, कामगारकल्याण केंद्र, धामणगाव रेल्वे यांची उपस्थिति लाभली. एड्स जन जागृती करण्यासाठी प्रमुख वक्ते म्हणून आदर्श महाविद्यालयाचे सूक्ष्मजीवशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख डॉ. निलेश ए. सोनुने उपस्थित होते. स्वागत समारंभ आटोपल्या नंतर राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. श्रीकांत पाटील यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. राष्ट्रीय सेवायोजनेचे सहा.कार्यक्रमअधिकारी डॉ. प्रविण एम. केचे यांनी कार्यक्रमाचे आपल्या विशिष्ट शैलीत प्रास्ताविक दिले आणि अतिथींची व उपस्थितांची मने जिंकली. प्रमुख वक्ते डॉ. निलेश ए. सोनुने यांनी एड्स या महाभयंकर बिमारी चा इतिहास एड्स ची कारणे व त्याची रोकथाम यावर प्रकाश टाकला. रेड रिबीन क्लब धामणगाव रेल्वे चे समुपदेशक श्री निलेश वानखडे व श्री विनोद इंगळे, केंद्र संचालक, कामगारकल्याण केंद्र, धामणगाव रेल्वे यांनी सुद्धा आपले विचार प्रकट केले. श्री निलेश वानखडे यांनी एड्स या बिमारी बद्दल भविष्याच्या शासकिय उपाय योजना या बद्दल माहिती दिली. श्री विनोद इंगळे यांनी कामगार कल्याण मंडळ बद्दल उपस्थितांना माहिती दिली. आपल्या अध्यक्षीय भाषणामध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाय. बी. गांडोळे यांनी आपले क्रांतिकारी विचार मांडून समाज परिवर्तन व एच. आय. व्ही. एड्स या विषयावर आपले मोलाचे विचार मांडले. तरुणाई जर एकवटली तर एड्स सारखी महाभयंकर बिमारी या आपण मानव जातीतून समूळ नायनाट करू शकतो असा विश्वास त्यांनी दर्शविला. कार्यक्रमाचे संपूर्ण सूत्र संचालन कु. तानिया टेकाम हिने केले व आभार प्रदर्शन निलेश गवळी याने केले.

कार्यक्रमाला महाविद्यालयाचे वरिष्ठ व कनिष्ठ विभागाच्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी आपले सहकार्य दिले व उपस्थिति दर्शविली. कार्यक्रमाच्या यशस्विते करिता डॉ. पूनम गहुकर यांच्या मार्गदर्शनात संपूर्ण रा. से. यो. स्वयंसेवकांनी अथक परिश्रम घेतले.




7

अमरावती दर्शन | अमरावती,गुरूवार ७ डिसेंबर २०२३

**Organize National AIDS Day**

तरुण भारत
Paschim Vidarbha | 2024-01-16 | Page- 7
epaper.tarunbharat.net

# आदर्श महाविद्यालयात ११५ दात्यांचे रक्तदान

## स्व. लक्ष्मीनारायण अग्रवाल जन्मशताब्दी महोत्सव

◆ धामणगावरेल्वे, १५ जानेवारी

धामणगाव एज्युकेशन सोसायटीद्वारा संचालित आदर्श विज्ञान, ज. भा. कला व बिरला वाणिज्य महाविद्यालय येथे नुकतीच १२ जानेवारीला स्वामी विवेकानंद यांची १६१ वी जयंती, राजमाता जिजाऊ यांची ४२६ वी जयंती व धामणगाव एज्युकेशन सोसायटीचे माजी अध्यक्ष स्व. लक्ष्मीनारायण अग्रवाल जन्मशताब्दी महोत्सव या निमित्ताने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ११५ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

शिबिराचे उद्‌घाटन धामणगाव एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष ॲड. रमेशचंद्र चांडक, सचिव ॲड. आशीष राठी, धामणगाव एज्युकेशन सोसायटीचे कार्यकारिणी सदस्य व महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष प्रदीपकुमार लुणावत, कार्यकारिणी सदस्य चंद्रशेखर पसारी, रक्तदान समिती धामणगावरेल्वे शाखेचे अध्यक्ष चेतन कोठारी तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाय. बी. गांडोळे व सावंगी मेघे येथील जवाहरलाल नेहरू मेडिकल कॉलेजच्या संपूर्ण वैद्यकीय चमूच्या प्रभारी डॉ. अंकिता गापचंदाणी यांच्या उपस्थितीत झाले.


तत्पूर्वी, दीप प्रज्वलन व प्रतिमांचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर रा. से. यो. चमूने विद्यापीठ गीत व स्वागतगीत सादर केले. त्यानंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष ॲड. रमेशचंद्र चांडक यांच्या परवानगीने रक्तदान शिबिराची प्रत्यक्ष सुरुवात झाली. शिबिरादरम्यान एकूण १४२ रक्तदात्यांनी उपस्थिती दर्शविली व डॉक्टरांच्या संमतीने ११५ जणांचे प्रत्यक्ष रक्तदान झाले.

या कार्यक्रमाचे संपूर्ण संचालन व आभार प्रदर्शन रा. से. यो. महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. पूनम गहकर यांनी केले. ◀*(तभा वृत्तसेवा)*



शिबिरात उपस्थित रक्तदाते व मान्यवर

**Celebration of Youth Day on the Occassion of Swami Vivekanad Jayanti through Blood Donation**








**Celebration of Gandhi Jayanti (Cleanliness Drive)**



**Celebration of Dr. B. R. Ambedkar Jayanti**



**Maharashtra State Foundation Day (01 May)**






**Vachan Prerna Din**




**Celebration of Constitution Day**



**Celebration of Republic Day**




**National Voters Day**